# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुर्वे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाइट:- http://kbmc.gov.in

जावक क्रमांक/कु-ब.न.प./नरवि/११०६२ /२०१९-२०२० दिनांक : १८ / १२/२०१९

अपेंडीक्स - I

## बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र

प्रति,

**मनोयज्ञ डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.अजित मनोहर सावंत व श्री.राहुल यज्ञेश ठोंबरे**
**द्वारा श्री.एस.एन.महाजनी (वास्तुशिल्पकार), कुळगांव-बदलापूर**

श्री.एस.एन.महाजनी (वास्तुशिल्पकार) बदलापूर. बांधकाम परवाना क्र. सीअे/९९/२४२६२ यांचे दिनांक ३०/०८/२०१९ रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीत स.नं.६९, हि.न.७/१ड, प्लॉट नं.३, मौजे जोवेली, ता.अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांचे कडील बांधकाम परवानगी क्र.कुबनप/नरवि/बांप/९३८९-१५६, दि.१९/१२/२०१७ अन्वये मंजूर केलेल्या नकाशे प्रमाणे राहणेसाठी बांधकाम पूर्ण केले आहे. तरी खालील अटींवर बांधकाम पूर्णतेचा दाखला/ भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. (बांधकाम पूर्ण झाल्याची तारीख २४/०८/२०१९)

| मजले | इमारत | | | | वापर |
|---|---|---|---|---|---|
| | भागस्टिल्ट | | | | |
| १) तळमजला | २ | सदनिका | ६ | खोल्या | रहिवास |
| २) पहिला मजला | ४ | सदनिका | १२ | खोल्या | |
| ३) दुसरा मजला | ४ | सदनिका | १२ | खोल्या | |
| ४) तिसरा मजला | ४ | सदनिका | १२ | खोल्या | |
| ५) चौथा मजला | ४ | सदनिका | १२ | खोल्या | |
| एकूण- | १८ | सदनिका | ५४ | खोल्या | |

**सबब, वरील जागेतील इमारतीसाठी जी श्री.एस.एन.महाजनी (वास्तुशिल्पकार) यांच्या देखरेखीखाली पूर्ण झालेली आहे, झालेले बांधकाम हे मंजूर नकाशानुसार आहे. सबब, खालील अटींचे अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

१ जेव्हा सज्जा (बाल्कनी) बंदिस्त करण्यात आला/आली असेल तर त्याचे समोरील व वरील १/३ क्षेत्रासाठी, लुवर्स ग्लास, शटर्स अथवा ग्रील्स लावणे, अनिवार्य राहील व पॅरोपेट सोडून उर्वरित समोरील क्षेत्रासाठी ग्लेजड शेटर्स बंदिस्त करणे आवश्यक राहील. तसेच नकाशात दर्शविलेले कॉर्नेस, ओर्नामेंटल प्रोजेक्शन बंदिस्त करणेत येऊ नये.

२ तळमजल्यास व टेरेस फ्लोअरला इलेवेशनल प्रोजेक्शन/ कॉर्नीस/ फ्लॉवरबेड असतील तर ते बंदिस्त करणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच आजूबाजूच्या सामासिक अंतरात कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३ भोगवटा प्रमाणपत्र सोबत दर्शविलेले नकाशातील बांधकामा व्यतिरिक्त इतर बांधकाम हे अनधिकृत समजण्यात येवून त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४ भविष्यात सामासिक अंतरातील जागा नगरपरिषदेस रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भासल्यास हस्तांतरीत करावी लागेल. टेरेस व पॉकेट टेरस बंदिस्त करु नये.

५ पावसाळी पाणी वाया जावू नये यासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग करणेत यावे व पाणी जमीनीमध्ये मुरवावे.

६ सुका व ओला कचरा अलगीकरणासाठी व साठा करण्यासाठी स्वतंत्रपणे जागा निर्धारित करुन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी संयंत्र उभारण्याची जबाबदारी विकासकाची आहे.

सहाय्यक नगर रचनाकार
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

कुळगांव-बदलापूर नगरपालिका कुळगांव

मुख्य अधिकारी तथा नियोजन प्राधिकारी
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

प्रत,

**कर विभाग, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद**